निजामपुरा पोलीस ठाणे भिवंडी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** निजामपूरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0626 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/06/2024 05:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | २०१ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 10/06/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/06/2024
**Time From (वेळेपासून):** 21:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/06/2024 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/06/2024 05:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आदर्श पार्कचे समोरील ,पानटपरी नजिक,भिवंडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a)**Name** (नाव): फारूख अब्दुल लतीफ शेख

(b)**Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 382,नदीनाका, वाडा रोड,मुसाफीर फुटवेअरच्या बाजूला,भिवंडी,निजामपूरा, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 382,नदीनाका, वाडा रोड,मुसाफीर फुटवेअरच्या बाजूला,भिवंडी,निजामपूरा, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक-- निळकंठ सुभाषराव खडके पोना --1297 | | वडील का नाम : सुभाषराव खडके | 1. रूमनं 302,रिध्दी साई अपार्टमेंट, बी विंग,टेमघरपाडा, कल्याण रोड,, भिवंडी, निजामपूरा,ठाणे शहर,महाराष्ट्, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)
**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस निजामपुरा ठाणे

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

गु.र.नं - 626/2024 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988(सुधारणा 2018)कलम 7 सह भादवि कलम 201 प्रमाणे

मी फारूख अब्दुल लतीफ शेख राहणार - 382, नदीनाका, वाडा रोड, मुसाफीर फुटवेअरच्या बाजूला, ता. भिवंडी, जि.ठाणे फिर्याद लिहून देतो की,

दिनांक 04/06/2024 रोजी रात्री 11.30 वाजण्याचे सुमारास भिवंडी अग्रारोड येथील बागे फिरदोस मशिदच्या समोर असलेल्या एच.पी. पेट्रोल पंपासमोर रोडवर माझे मित्राचा भाउ रईस अब्दुल रॉफ खान आणी सोनटक्के व आणखी एक पोलीस अंमलदार यांच्यात भांडण झाले होते. त्यात पोलीसांनी निजामपुरा पोलीस स्टेशन येथे 353 ची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर दिनांक 06/06/2024 रोजी निजामपुरा पोलीस स्टेशनचे डीबी स्टाफचे इम्रान शेख यांनी मला रात्री 01.00 वाजताचे सुमारास रामभुवन हॉटेल जवळ भेटले होते वरील दाखल गुन्हयात केलेल्या पंचनाम्यावर मला सही करण्यासाठी निजामपुरा पोलीस स्टेशन येथे जाणेस सांगीतले होते. त्याप्रमाणे मी निजामपुरा पोलीस स्टेशला जावून पोलीस अंमलदार श्री. गायकवाड यांना जावून भेटलो तेव्हा त्यांनी माझे नाव, वय, धंदा, पुर्ण पत्ता, मोबाईल नंबर विचारून लिहुन घेतले व पंचनाम्यावर सही घेतली त्यानंतर मी तेथुन घरी निघुन आलो. त्यानंतर रात्री 01.30 वाजता माझा मित्र जावेद खान यांनी त्याचा मोबाईल नं. 8459393968 वरून मला माझा मोबाईल नं. 9284924476 वर फोन करून सांगितले त्याचा भाउ सईद खान यास पोलीस शोधत घरी आले आहेत तर काय करू? असे विचारले असता मी त्याला सांगितले की, तुझे घरी मयत झाले असल्यामुळे तु तुझे भावाला कोठेतरी बाहेर झोपायला सांग, असे सांगुन मी माझा फोन बंद केला.

त्यानंतर दिनांक 07/06/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता माझी आई नामे खातुनबी शेख ही दुकानात असताना दोन पोलीस माझे विषयी चौकशी करत होते व त्यावेळी त्यांनी दोन फोन नंबर देवुन संपर्क करण्यास सांगितला. त्यानंतर माझे आईने मला निरोप दिला त्याप्रमाणे मी दोन्ही नंबरवर फोन केला असता श्री. निळकंठ खडके व श्री. सुशिल धोत्रे यांचे नंबर असल्याचे समजले व त्यावेळेस त्यांनी मला रात्री हसीन फरहान टॉकीज जवळ भेटण्यास बोलविले. त्याप्रमाणे मी, त्याच दिवशी रात्री 11.00 वाजता हसीन फरहान टॉकीज येथे पोलीस अंमलदार श्री. निळकंठ खडके व श्री. सुशिल धोत्रे यांना भेटलो असता, दोघांनी मला सांगितले की, जावेद खान याचे मोबाईलमध्ये तुझी रेकॉर्डींग मिळाली आहे. त्यात तु जावेदचा भाउ यास घरी झोपवू नकोस असे सांगत होतास त्यामुळे तुला ही त्या गुन्हयात अटक करावी लागेल असे सांगितले. मी त्यांना सांगितले की मी काही केलेले नाही मला सोडुन दया तेव्हा श्री. निळकंठ खडके व श्री. सुशिल धोत्रे यांनी सांगितले की, सीनियर साहेबांनी सांगितले आहे तुला अटक करावी लागेल. मी त्या दोघांना विनंती केली की, यामध्ये तुम्ही मला अडकवु नका. तेव्हा त्या दोघांनी मला सांगितले की, तुला 50,000/-रूपये दयावे लागतील तेव्हा सीनीयर साहेब तुला सोडतील, मी त्यास काही रक्कम कमी करण्यास सांगीतले असता त्यांनी 30,000/- तुला दयावे लागतील असे सांगीतले सदरची रक्कम मी तुम्हाला सोमवारी देतो असे सांगितले होते.

त्यानंतर दिनांक 10/06/2024 रोजी दुपारी 12.22 वाजता सदरची रक्कम मागण्यासाठी श्री. निळकंठ खडके यांचा मोबाईल नं. 8208579162 वरून माझा मोबाईल नं. 9284924476 वर फोन आला होता पण मी त्यांचा फोन उचलला नाही. त्यानंतर लगेच माझा मित्र रफिक याचा मला फोन आला व त्याने सांगितले की श्री. खडके साहेब पैसे मांग रहे हैं, तु कब देगा, तेव्हा मी त्याला सांगितले की, '' मै आज रात 9 बजे उनसे मिलने वाला हुँ''

त्यावेळी माझी खात्री झाली कि, मी, पोलीस अंमलदार श्री. निळकंठ खडके व श्री. सुशिल धोत्रे यांना त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम दिली नाही तर मला गुन्हयामध्ये अटक करतील. परंतु मला त्यांनी मागणी केल्याप्रमाणे 30,000/- रूपये लाचेची देण्याची इच्छा नाही. त्याकरीता निजामपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार श्री. निळकंठ खडके व श्री. सुशिल धोत्रे यांच्या विरूद्ध अँन्टी करप्शन अॅक्ट प्रमाणे कायदेशिर कार्यवाही होण्याकरीता मी

दिनांक 10/06/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात माझे स्वःहस्ताक्षरात लेखी तक्रार लिहून दिली.

माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पोउपअधी/श्री.जाधव यांनी दोन शासकीय पंच साक्षीदारांना पाचारण केले. पंचाच्या उपस्थितीत सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून मी, माझा मोबाईल नं. 9284924476 वरून लोकसेवक श्री. खडके यांचा मोबाईल नं. 8208579162 वर कॉल केला असता, त्यांनी मला वंजारपटटी नाका येथे येण्यास सांगितले. सदरचे संभाषण डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर आम्ही शासकीय वाहनातून अ◌ेसीबी, ठाणे कार्यालयातून निघून भिवंडी येथे आमपाडा येथे आलो. त्यानंतर लोकसेवक खडके यांचे वर नमुद मोबाईलवरून कॉल आला त्यावेळी त्यांनी मला वंजारपटटी नाक्यावरील बारादरी या हॉटेलवर येण्यास सांगितले परंतु सदरचे संभाषण तांत्रिक अडचणीमुळे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डवर ध्वनिमुद्रीत झालेले नाही. त्यानंतर मी माझे मित्राचे दुचाकी वाहन टीव्हीएस बर्गमॅन वाहन क्रमांक एम. एच.04 केझेड 3616 वरूनपंच नं. 1 श्री. गोखले यांचे समवेत डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरसह बारादरी हॉटेलमध्ये गेलो असता, तेथे मला लोकसेवक खडके भेटले त्यावेळी त्यांनी मला पैशाची मागणी केली असता, मी त्यांना काही रक्कम कमी करण्यास विनंती केली असता, खडके यांनी मला एकुण रक्कमेमधुन हजार रूपये कमी देण्याबाबत सांगितले. सदरचे संभाषण डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. अशाप्रकारे लोकसेवक खडके यांनी माझेकडे 30,000/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती 29,000/- रूपये स्विकारण्याचे पडताळणी कारवाई दरम्यान स्पष्ट झाले आहे. त्यानंतर मी व पंच श्री. गोखले असे दोघे माझेकडील दुचाकी वाहनावरून शासकीय वाहनाजवळ परत आलो. त्यानंतर पोउपअधी/श्री. जाधव यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना सध्या माझेकडे एवढी रक्कम जमा नसुन दिनांक 11/06/2024 रोजी रक्कमेची व्यवस्था होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोउपअधी श्री. जाधव यांनी मला सदरची बाब लोकसेवक खडके यांना फोन वरून सांगण्याबाबत सुचना केल्या. त्यानुसार मी माझे मोबाईलवरून लोकसेवक खडके यांचे मोबाईलवर फोन केला असता, त्यांचा फोन नॉटरिचेबल आला. त्यानंतर थोडावेळ लोकसेवक खडके यांचे मोबाईलची वाट पाहीली परंतू त्यांचा कॉल न आल्याने पोउपअधी श्री. जाधव यांचे सुचनेवरून सापळा कारवाई दिनांक 11/06/2024 रोजी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानंतर दिनांक 11/06/2024 रोजी सुमारे सकाळी 11.48 वाजेच्या सुमारास लोकसेवक खडके यांचे सहकारी श्री. इम्रान शेख यांचे मोबाईल क्रमांक 81044267656 या मोबाईलवरून कॉल आला परंतू सदरचा कॉल मी उचलला नाही. तद्नंतर सदरच्या मोबाईल क्रमांकावरून मला व्हॉटस्अप कॉल आला परंतू मी तो कॉल देखील उचलला नाही. त्यानंतर मी पोउपअधी श्री. जाधव यांना फोन करून मला येत असलेल्या कॉल बाबत सांगितले असता, त्यांनी मला ते एक दिड तासामध्ये भिवंडी येथे पोहचणार असल्याचे सांगितले. त्यानंतर सुमारे 13.35 वा. चे सुमारास मी माझे मित्राचे दुचाकी वाहन टीव्हीएस बर्गमॅन वाहन क्रमांक एम.एच.04 केझेड 3616 वरून आमपाडा येथील रस्त्याच्या कडेला थांबलेल्या शासकीय वाहनाजवळ आलो. त्यावेळी सदर वाहनामध्ये पोउपअधी श्री. जाधव दोन पंच व सापळा पथक असे हजर होते. त्यानंतर सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता केल्यानंतर माझेकडील लाचेची रक्कम रूपये 29,000/-रूपये त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 58 चलनी नोटा घेवून त्या नोटांना पंचां समक्ष अ◌ॅथ्रासिन पावडर लावून त्याचे प्रात्येक्षिक अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात मला व पंचांना दाखविण्यात आले. त्यानंतर मला पंचांना व सापळा पथकास पोउपअधी श्री. जाधव यांनी सुचना दिल्या. त्यानंतर सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता करून मला माझा मोबाईल नंबर वरून लोकसेवक खडके याचा मोबाईल नंबर 8208579162 वर कॉल करण्याबाबत पोउपअधी श्री. जाधव यांनी सुचना दिल्यावरून मी लोकसेवक खडके यांना दोनवेळा कॉल केला परंतु त्यांनी कॉल उचलला नाही. त्यानंतर 15.31 वा.चे सुमारास लोकसेवक खडके यांनी त्यांचा मोबाईल नंबर 8208579162 वरून कॉल करून मला रामभुवन हॉटेल येथे येण्यास सांगितले. सदरचे संभाषण हे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्या दरम्यान मी, सापळा पथकाकरीता माझे परिचयाचे व्यक्तीकडून सुझुकी अँव्हेनिस व होन्डा शाईन क्र. एम.एच. 04 केई 5615 मागविल्या होत्या. त्यानंतर मी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरसह माझे दुचाकी वरून पंच श्री. गोखले यांसे सह जाण्यास निघालो व माझे मागोमाग सापळा पथक व पंच नं. 2 असे दुचाकी व रिक्षाने रामभुवन हॉटेल येथे पोहचल्यावर तेथे लोकसेवक खडके हे अगादर पासूनच उभे होते त्यांना पाहून मी पंच गोखले यांना गाडीवरून उतरण्यास सांगितले. त्यानुसार पंच गोखले गाडीवरून उतरले. त्यानंतर मी गाडी रस्त्याच्या कडेला लावून लोकसेवक खडके यांचेजवळ गेलो व त्यांना हाक मारली त्यानंतर लोकसेवक खडके यांनी माझेशी अवांतर गप्पा मारल्यानंतर त्यांनी मला ईशा-याने त्यांचे उजव्या हाताचा अंगठा नजिकच्या बोटावर घासून लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली, तसेच मला पिशवीमध्ये टाकून दण्यास सांगितले त्यावर मी त्यांना पिशवी नसल्याचे सांगितले असता, त्यांनी मला पिशवीमधूनच आणण्याचे

सांगितले. त्यावेळी रामभुवन हॉटेलवर गर्दी असल्याने लोकसेवक खडके हे माझेकडून तेथे लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत असे मला वाटल्याने मी त्यांना रामभुवन हॉटेलच्या बाजूला असलेल्या पानटपरीच्या पाठीमागे बोलाविले परंतू ते आले नाहीत. त्यानंतर त्यांनी मला ईशा-याने रामभुवन हॉटेलच्या बाजूस असलेल्या छोटया रस्त्यावर जाण्यास सांगितले. त्यानुसार मी तेथे गेल्यावर लोकसेवक खडके हे दुचाकी शासकीय वाहनाने तेथे आले मला त्यांचे गाडीवर बसवून तेथून घेवून गेले. गाडीवर बसल्यानंतर त्यांनी मला प्लास्टीकच्या पिशवीमध्ये रक्कम देण्यास सांगितले. त्या दरम्यान मला पोउपअधी श्री. जाधव यांनी का◌ॅल करून योग्य त्या सुचना दिल्या. त्या दरम्यान मी माझे लोकेशन पोउपअधी श्री. जाधव यांना फोनवरून देत होतो. लोकसेवक खडके यांचे सोबत मी आदर्श पार्क येथे आम्ही पोहचल्यानंतर आदर्श पार्कच्या समोरील बाजूस पानटपरी नजिक लोकसेवक खडके यांनी गाडी थांबवून मला उतरण्यास सांगितले व माझेकडे ईशा-याने पैशाची मागणी केली. त्यावेळी मी माझे पँन्टच्या पुढील बाजूच्या उजव्या खिशातून लाचेची रक्कम काढून लोकसेवक खडके यांचे समोर धरली असता, ती त्यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारून त्यांचे पँन्टच्या पुढील उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर लोकसेवक खडके यांनी एक रिक्षा थांबवून त्यांनी मला जाण्यास सांगितले. परंतू मी त्यांना बोलण्याच्या ओघात त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला परंतू ते न थांबता ते त्यांच्या दुचाकी वरून तेथून निघून गेले. त्यानंतर मी काही अंतर पुढे आल्यावर तेथे मला सापळा पथक मिळाले. त्यानंतर पोउपअधी श्री. जाधव यांनी माझेकडे लोकसेवक खडके बाबत विचारणा केली असता, ते निजामपुरा पोलीस स्टेशनला गेल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजन निजामपुरा पोलीस स्टेशन येथे पोहचल्यानंतर मी व मपोहवा जोंधळे हया लोकसेवक खडके यांची दुचाकी उभी आहे अगर कसे याची पाहणी करीत असताना, लोकसेवक खडके हे शासकीय दुचाकी क्रमांक एम.एच. 12 व्ही.एस. 2876 वरून निजामपुरा पोलीस स्टेशनच्या आवारामध्ये मागिल गेटने येवून दुचाकीने येताना दिसले. त्याबाबत मी, मपोहवा जोंधळे यांना सांगितले असता, मपोहवा जोंधळे हया लोकसेवक खडके यांचे दिशेने गेल्या त्यावेळी खडके यांना मपोहवा जोंधळे यांचा संशय आल्याने ते तेथून पळू लागले. ते पाहून त्यांचे मागोमाग मी व मपोहवा जोंधळे असे धावलो. तसेच पोउपअधी श्री. जाधव यांनी गेटनजिक लोकसेवक खडके यांना पकडण्याचा प्रयत्न केला परंतु लोकसेवक खडके यांनी पोउपअधी श्री. जाधव यांना धक्का देवून खाली पाडून पळून गेले. त्यांचे मागोमाग आम्ही व पंच धावलो परंतू लोकसेवक खडके हे तेथील कोणत्या गल्लीमधून पळून गेले ते आम्हाला कळले नाही. त्यानंतर आम्ही पुन्हा निजामपुरा पोलीस स्टेशन येथे आलो. त्यानंतर पोउपअधी श्री. जाधव यांनी माझेकडून संपुर्ण हकीकत जाणुन घेतली.
अशा प्रकारे लोकसेवक निळकंठ सुभाषराव खडके, वय-41 वर्षे, पोना/1297, नेमणुक - निजामपुर पोलीस स्टेशन, ठाणे शहर राहणार - रिध्दी साई अपार्टमेंट, बी विंग, रूम नं. 302, टेमघरपाडा, कल्याण रोड, भिवंडी यांनी लोकसेवक या नात्याने त्यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरूपयोग करून मला निजामपुरा पो.स्टे. गुन्हा रजि. नं. 614/2024 या गुन्हयामध्ये अटक न करण्यासाठी माझ्याकडे दिनांक10/06/2024 रोजी 30,000/- रूपये मागणी करून तडजोडीअंती 29,000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करून ती, दिनांक 11/06/2024 रोजी 15.40 ते 16.20 वा.चे दरम्यान आदर्श पार्कचे समोरील पानटपरी नजिक माझ्याकडून रूपये 29,000/- लाचेची रक्कम स्विकारून ते तेथून निघून गेले. त्यानंतर ते निजामपुरा पोलीस स्टेशनच्या आवारातून लाचेच्या रक्कमेसह पळून गेले. म्हणून माझी लोकसेवक निळकंठ सुभाषराव खडके यांच्या विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANTOSH GAUBA AVHAD(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ASS.
पोलीस ठाणे अंमलदार
निजामपूर पोलीस ठाणे भिवंडी

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** SANTOSH GAUBA A\
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):**